# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
# जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

*फोन नं.(०२०) २६०५०६४१*

**ई-मेल आयडी :-** comscea.pune@maharashtra.gov.in secscea.pune@maharashtra.gov.in

जा.क्र.रासनिप्रा/निवडणुक/क वर्ग/सर्व.मार्गदर्शक सूचना/७६० /सन २०१४ दि.१३/११/२०१४

प्रति,

१.जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)
२. तालुका सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)

**विषय : 'क' वर्गातील सहकारी संस्थांचे समिती निवडणूकीसाठी अनुसरावयाच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सुचना...**

**वाचा : महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४, नियम ७५.**

राज्यातील सहकारी संस्थांच्या सार्वत्रिक निवडणूका, रिक्त पदांच्या निवडणूका व पदाधिकाऱ्यांच्या निवडणूका घेण्याची जबाबदारी व अधिकार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब अन्वये राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास आहेत. सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ अंमलात आले आहेत. या निवडणूक नियमातील नियम ४ अन्वये, निवडणूकीचे प्रयोजनार्थ 'अ', 'ब', 'क', 'ड' असे सहकारी संस्थांचे वर्ग करण्यात आले आहेत. 'क' वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्यासबंधी निवडणूक नियमातील नियम ७५ अन्वये तरतुद करण्यात आली आहे. 'क' वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणूका तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांनी घेण्याची तरतूद आहे.

**त्या अनुषंगाने सहकारी संस्थांच्या निवडणुका सपन्न् करण्याच्या पार्श्वभूमीवर प्राधिकरणाने एक विशिष्ट धोरण अंगिकारले आहे. हया धोरणाची वैशिष्टये खालीलप्रमाणे.**

१. **सहकारी संस्थांच्या निवडणुकांमध्ये अचूक, निर्दोष मतदारयादीस अनन्यसाधारण असे महत्व आहे. सदर मतदार यादी ही नियमातील तरतुदी (नियम ६,७,८,९,१०,११) तसेच कायद्यातील तरतुदी (कलम २६,२७,४८,७३ कअ लक्षात घेवून पारदर्शक पध्दतीने तयार करणे (अन्यथा कलम १४६ चे उपकलम e-२, h-१, k, p, q अन्वये कारवाई होवू शकते.)**
२. **निवडणुका हया मोकळया व भयमुक्त वातावरणात घेणे.**
३. **निवडणुक प्रक्रिया ही पारदर्शक असणे.**
४. **निवडणुकांमध्ये मतदानाच्या टक्केवारीत वाढ होणेचे अनुषंगाने प्रयत्न करणे.**
५. **मतदान करतांना विहीत ओळखपत्राच्या आधारेच मतदान अनुज्ञेय असणे.**

'क' प्रकारच्या संस्था नियम ४ अन्वये खालीलप्रमाणे आहेत.

**'क' वर्ग प्रकारात मोडणा-या संस्था**

(1) रुपये दहा लाखांपेक्षा कमी वसूल भाग भांडवल असणाऱ्या सर्व प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था व आदिवासी सहकारी पतसंस्था,

(2) लगतच्या मागिल वर्षी दिनांक 31 मार्च रोजी रुपये शंभर लाख पेक्षा कमी ठेवी असलेल्या, किंवा रुपये दहा लाखांपेक्षा कमी वसूल भाग भांडवल असणाऱ्या सर्व सहकारी पतसंस्था,

(3) लगतच्या मागिल वर्षी दिनांक 31 मार्च रोजी, रुपये शंभर लाख पेक्षा कमी वसूल भाग भांडवल असलेल्या पगारदारांच्या सहकारी पतसंस्था,

(4) लगतच्या मागिल वर्षी दिनांक 31 मार्च रोजी दोनशे किंवा दोनशे पेक्षा जास्त सभासद असलेल्या गृहनिर्माण संस्था,

(5) सर्व प्राथमिक ग्राहक सहकारी संस्था,

(6) सर्व प्राथमिक दुग्ध, कुक्कुट, मत्स्य, वराह आणि पशुधन सहकारी संस्था,

(7) शासकीय सहाय्य नसलेल्या सर्व सहकारी औद्योगिक संस्था / सहकारी औद्योगिक वसाहती,

(8) साखर कारखाने वगळता शासकीय सहाय्य नसलेल्या इतर सहकारी प्रक्रिया संस्था,

(9) सर्व प्रकारच्या प्राथमिक सहकारी पणन संस्था,

(10) सर्व प्रकारच्या प्राथमिक विणकर (हातमाग व यंत्रमाग) सहकारी संस्था,

(11) इतर कृषी सहकारी संस्था,

(12) लगतच्या मागिल वर्षी दिनांक 31 मार्च रोजी दोनशे किंवा दोनशे पेक्षा जास्त सभासद असलेल्या सहकारी उपसा जलसिंचन आणि सहकारी पाणी वापर संस्था,

(13) वरील 'अ' व 'ब' प्रकारामध्ये आणि खालील 'ड' प्रकारामध्ये न मोडणा-या इतर कोणत्याही सहकारी संस्था किंवा संस्थांचा प्रवर्ग.

सदर संस्थांच्या निवडणूकांबाबत मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे निर्गमित करण्यात येत आहेत.

१) 'क' वर्गातील दि.३१/०३/२०१३ अखेर तसेच दि.०१/०४/२०१३ ते ३१/१०/२०१४ या मुदतीत दोन्ही दिनांक धरुन समितीची मुदत संपलेल्या किती संस्था निवडणूकीस पात्र आहेत त्याचा जिल्हा / तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांनी अचूक आढावा घ्यावा . संस्था प्रकारनिहाय तपशीलाचा तालुकावार गोषवारा तयार करावा.

२) सहकारी संस्थेचे सचिव / व्यवस्थापक यांनी निवडणूक नियमातील नियम ५(२) अन्वये नमुना ई-२ मध्ये माहिती तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांना तात्काळ द्यावी. ई-२ नमूना संस्थेने नाही दिल्यास नियम ५ चे परंतुकान्वये तालुका / प्रभाग सहकार निवडणुक अधिकारी यांनी कार्यवाही करावी.

३) ई-२ नमून्यासोबतच संस्थेचे मंजूर उपविधीची प्रत तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकाऱ्यास संस्थेचे सचिव / व्यवस्थापक यांनी देणे आवश्यक आहे.

४) अ.क्रं.१ मध्ये नमूद कालावधीतील निवडणूकीस पात्र सर्व संस्थांची माहिती नियम ५(१) नमुना ई-१ मध्ये जिल्हा/तालुका /प्रभाग सहकारी निवडणूक अधिकाऱ्याने ई-मेलव्दारे प्राधिकरणास सादर करावी.

५) निवडणूकीस पात्र सर्व संस्थांची निवडणूक प्रक्रीया डिसेंबर मध्यावधीपर्यंत पूर्ण करण्याचा कृती कार्यक्रम तालुका /प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांनी तयार करावा. त्यासाठी लागणाऱ्या आवश्यक मनुष्यबळाचे नियोजन ही जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकाऱ्याने करावे.

६) हया प्रयोजनार्थ तालुक्यातील 'क' प्रकारातील ज्या संस्थांची निवडणूक घ्यावयाची असेल अशा संस्थांच्या प्रमुख अधिकाऱ्यांची एखादी एकत्रित बैठक घेवून मतदार यादी अचुक, निर्दोष व पारदर्शक पध्दतीने नियमानुसार करण्याबाबत आवश्यक त्या सूचना खालील प्रमाणे द्याव्यात.

अ) संस्थेने प्राथमिक मतदार यादी दि.३१/१०/२०१४ या अर्हता दिनांकावर तयार करावयाची आहे. ती तयार करताना महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४, नियम ६ चे अनुपालनास्तव दक्षता घ्यावी.

ब) प्राथमिक मतदार यादी तयार करताना, सभासद महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २६(१) व कलम २७ अन्वये पात्र असावा. प्राथमिक विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांबाबत कलम ४८ अन्वये ही पात्र असावा व कलम ७३ कअ अन्वये कसूरदार (defaulter)नसावा. तसेच त्या-त्या संस्थांच्या उपविधीतील तरतूदी अन्वये अनर्ह (Disqualified) नसावा.

क) संस्थेचे सचिव / व्यवस्थापक यांनी संस्थेने प्राथमिक मतदार यादी तयार करतांना संस्थेच्या "आय" रजिस्टरशी मेळ घेऊन तसेच "जे" रजिस्टर अनुसार तयार केल्यानंतर कायद्यातील कलम २७ (१०) प्रमाणे थकबाकीदारांची नावे वगळुन तसेच कायद्यातील अन्य संबंधित तरतुदीचे पालन करुनच केली जावी अशी अपेक्षा आहे. Active members बाबत, कायद्यातील कलम २६ च्या शेवटच्या परंतुकांची तरतूद स्पष्ट आहे त्यांचीही नोंद घ्यावी. प्राथमिक मतदार यादी ही तयार करण्याची जबाबदारी संस्थेच्या अधिका-यांची असल्यामुळे त्यांच्या निदर्शनास विद्यमान सहकारी कायद्यातील दंडात्मक तदतूदी कलम १४६ (e-2), (h-1), (k), (p) व (q) हया लक्षात आणून देणे गरजेचे राहील. हा तरतूदी अत्यंत कठोर असून निवडणू प्रक्रियेसाठी देखील त्या प्रामुख्याने लागू राहतील. हया तरतूदी खालीलप्रमाणे

१४६ (e-2) :- एखाद्या व्यक्तीने हेतुपुरस्सर कलम ७३ कअ, पोटकलम (१), खंड (एक) अधील स्पष्टीकरणातील शब्दप्रयोगाच्या अर्थान्तर्गत ही व्यक्ती "कसूरदार आहे" किंवा "कसूरदार नाही" अशा आशयाचे कोणत्याही नमुन्यात खोटे प्रमाणपत्र देणे ; किंवा

(h-1) :- संस्थेची समिती किंवा तिचा अधिकारी किंवा सदस्य निवडणूकीमध्ये भ्रष्टाचाराच्या व्यवहारात गुंतलेला असणे किंवा ;

(k) :- एखाद्या संस्थेच्या समितीने किंवा तिच्या अधिका-याने किंवा सदस्याने जणूनबुजून खोटे विवरण तयार करणे, किंवा खोटी माहिती पुरविणे किंवा योग्य हिशोब ठेवण्यात कसूर करणे ; किंवा

(p) :- एखाद्या संस्थेच्या कोणत्याही अधिका-याने किंवा सदस्याने कोणतीही पुस्तके, कागदपत्रे किंवा कर्जरोखे नष्ट करणे, त्यात खाडाखोड करणे, अनधिकृत फिरवाफिरव करणे, अन्यथा त्यात फेरफार करणे किंवा ती खोटी करणे किंवा छपवून ठेवणे किंवा अशा प्रकारे नष्ट करण्यात, खाडाखोड करण्यात, फेरफार करण्यात, खोटे करण्यात किंवा छपवून ठेवण्यात सहभागी होणे किंवा त्या संस्थेच्या मालकीच्या कोणत्याही नोंदवहीत, लेखापुस्तकात किंवा दस्तऐवजात कोणतीही खोटी किंवा लबाडीची नोंद करणे किंवा असे करण्यात सहभागी होणे; किंवा

(q) :- एखाद्या संस्थेच्या कोणत्याही अधिका-याने किंवा सदस्याने किंवा कोणत्याही व्यक्तीने नियमान्वये अपराध म्हणून जाहीर केलेले कोणतेही कृत्य करणे.

हया तरतुदींचे उल्लंघन झाल्यास कठोर शिक्षेची तरतूद कलम **१४७** मध्ये **(e-2), (h-1), (k), (p) व (q)** अनुसार करण्यात आलेली आहे त्या खालील प्रमाणे.

१४७ (e-2) :- त्या कलमाच्या खंड (ई-२) खालील अपराध असत्यास तीन वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा किंवा पंधरा हजार रुपयांपर्यंत वाढवता येईल इतक्या दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील;

(h-1) :- त्या कलमाच्या खंड (ह-१) खालील अपराध असल्यास, पाच हजार रुपयापर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

(k) :- त्या कलमाच्या खंड (के) खालील अपराध असल्यास, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा किंवा दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील;

(p) :- त्या कलमाच्या खंड (प) खालील अपराध असल्यास, तीन वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा किंवा पंधरा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील;

(q) :- त्या कलमाच्या खंड (क्यू) खालील अपराध असल्यास एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

हया सर्व तरतुदी निवडणुकीसाठी नियुक्त करावयाच्या कर्मचारी / अधिका-यांच्या निदर्शनासही आणून देणे गरजेचे राहील. सर्व संस्थंच्या अधिका-यांना हया तदतुदीची स्पष्ट जाणीव करुन दिल्यास मतदार यादी अचूक, निर्दोष व पारर्शक पध्दतीने होवू शकेल.

वरील प्रमाणे तयार करण्यात आलेली प्राथमिक मतदार यादी महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ नियम ७ अन्वये नमुना ई-३ मध्ये प्राधिकरणाने विहीत केलेल्या प्रमाणपत्रासह तालुका / प्रभाग सहकारी निवडणुक अधिकारी हयांना द्यावी. सदर यादी तालुका / प्रभाग सहकारी निवडणुक अधिका-याने संबंधित संस्थेच्या निवडणुक निर्णय अधिका-यास संस्थेच्या निवडणुक कार्यक्रमास मान्यता देतांना त्या समवेत यावी. तसेच निवडणुक निधीची रक्कम संस्थेकडुन भरणा करुन घ्यावी.

७) निवडणूकीसाठी नियम ७५ मधील तरतुदीनुसार प्रशिक्षित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नेमणूक तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांनी करावी. तालुक्यातील एकुण निवडणुक घ्यावयाच्या 'क' प्रकारच्या संस्थांबाबत एकत्रित अभ्यास करून संस्थानिहाय निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या नियुक्तीचा विचार करणे तालुका / प्रभाग सहकार निवडणूक अधिकाऱ्यास आवश्यक राहील.

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती देताना प्रशासन /लेखापरिक्षण विभागातील सहकार अधिकारी श्रेणी (१) व श्रेणी (२), सहाय्यक सहकारी अधिकारी व सहकार विभागातील इतर अधिकारी कर्मचारी यांची नियुक्ती तालुका / प्रभाग सहकार निवडणूक अधिकारी यांनी करावी. तालुक्यातील 'क' वर्गाच्या निवडणूकांसाठी निवडणुक निर्णय अधिकारी नेमणुक करताना उपलब्ध मनुष्यबळाचा पुरेपुर वापर होणे गरजेचे राहील जेणे करुन निवडणुका विहीत मुदतीत पुर्ण होतील. असे करतांना तालुक्यातील निवडणुका घ्यावयाच्या 'क' प्रकारच्या अशा संस्थांच्या प्रकारनिहाय प्रत्यक्षात किती निवडणुका बिनविरोध होतील, किती ठिकाणी निवडणुका घ्याव्या लागेल, किती ठिकाणी तीव्र चुरस असेल असा प्राथमिक अंदाज घेवून तसेच क्षेत्रिय अधिका-यांशी चर्चा करुन, जेथे प्रत्यक्षात निवडणुका होतील अशा संस्थांसाठी अनुभवी, अभ्यासू व कार्यक्षम अधिकारी / कर्मचा-यांची नियुक्ती निवडणुक निर्णय अधिकारी म्हणून करणे योग्य होईल. त्या दृष्टीने जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांनी तसेच तालुका सहकारी निवडणुक अधिकारी हयांनी एकत्रित नियोजन करणे आवश्यक राहील.

८) नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर लगेच निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने नियम ७५ मधील तरतुदीनूसार निवडणूक कार्यक्रम तयार करुन त्यास तालुका सहकारी निवडणुक अधिका-यांची रितसर मान्यता घ्यावी. व मंजूर कार्यक्रमाची प्रत प्राधिकरणासही पाठवावी. तसेच संबंधित जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांनी त्यांचे जिल्हयातील मुदत संपलेल्या सर्व 'क' वर्ग संस्थांच्या निवडणुक प्रक्रिया चालु करणेपूर्वी उक्त संस्था आणि त्यांचे मुदत संपलेल्या

दिनांकासह यादी प्रमाणित करुन त्या संस्थांचे ई-१ नमुना माहिती प्राधिकरणास सादर करणे बंधनकारक राहील. तालुका / प्रभाग सहकारी निवडणुक अधिकारी यांनी निवडणुक कार्यक्रम मंजूर करतांना म्हणजेच संस्थांच्या निवडणुक कार्यक्रमांना मान्यता देतांना त्या-त्या तालुक्यातील 'क' प्रकारच्या निवडणुकांचा एकूणच कार्यक्रम नजरेसमोर तालुका सहकारी निवडणुक अधिका-यांना ठेवावा लागेल. सर्वच कार्यक्रम एकाच दिवशी घेतल्यास अडचणीचे ठरू शकेल. दोन ते तीन दिवसांच्या टप्प्याटप्प्याने हा कार्यक्रम ५ ते ६ संस्थांचा एकत्रित मान्य केल्यास वरिष्ठानांही त्यावर नियंत्रण ठेवणे शक्य होईल, व उपलब्ध मनुष्यबळाचे योग्य नियोजनही होईल. तालुका सहकारी निवडणुक अधिका-यांने निवडणुक कार्यक्रमास मान्यता दिल्याच्या पुढील दिवसापासुन नियम ७५ मध्ये दिल्यानुसार प्रत्यक्ष निवडणुक प्रकीयेस सुरुवात होईल. म्हणजेच प्राथमिक मतदार यादी प्रसिध्द होईल. सदर प्राथमिक मतदार यादी निवडणुक नियम ७५ अन्वये निवडणुक निर्णय अधिका-याने कायदा नियम, निवडणुक नियम व उपविधीतील तरतुदींचे अनुपालन करुन अंतिम करणेची आहे.

९) संस्थेच्या मंजुर उपविधीत संचालक मंडळ रचनेबाबत काहीही नमुद असले तरी, निवडणुक निर्णय अधिका-याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ ब अन्वये अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती सदस्यांसाठी एक पद, इतर मागासवर्गीयांसाठी एक पद आणि विमुक्त जाती, भटक्या जमाती किंवा विशेष मागासवर्गासाठी एक पद असे एकुण ३ आरक्षणांचे पदांसाठी निवडणुक घेणे अनिवार्य आहे. त्याच प्रमाणे महाराष्ट्र सहाकरी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ क अन्वये महिलांकरीता दोन जागांसाठी निवडणुक घेणे अनिवार्य आहे.

१०) पात्र संस्थांचा निवडणुक कार्यक्रम मान्य करताच तालुका सहकारी निवडणुक अधिका-यांनी ज्या संस्थेची समितीची मुदत प्रथम संपली आहे ती प्रथम या क्रमानुसार निवडणूका घेणेचे नियोजन करावे.

११) निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने निवडणूक नियम ७५ (४)(ब) नूसार निवडणूकीचा निकाल तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकाऱ्यास दिल्यानंतर तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकाऱ्याने संबंधीत संसथेच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडीसाठी निवडणूक नियम ७७ मधील तरतुदीनूसार विहीत मुदतीत संबधित संस्थेचे निवडणुक निर्णय अधिकारी यांची पदाधिकारी निवडीच्या सभेचा अध्यासी अधिकारी म्हणुन नेमणूक करावी व अध्यासी अधिकाऱ्याने पदाधिकाऱ्यांची निवड करुन अहवाल तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकाऱ्यास त्याच दिवशी सादर करावा.

**सदरील सर्वसाधारण मार्गदर्शक सुचना हया मा. आयुक्त राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य पुणे, यांचे आदेशाने व निर्देशाप्रमाणे निर्गमीत करण्यात येत आहे.**

(स्वाक्षरी)

**(डॉ. आनंद जोगदंड)** १३/११/१५

सचिव

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,

महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत माहितीसाठी,

विभागिय सहनिबंधक,सहकारी संस्था,(सर्व)

प्रत माहितीसाठी सस्नेह,

१. मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य,पुणे.

२. मा.साखर आयुक्त,महाराष्ट्र राज्य,पुणे.

३. मा.संचालक,हातमाग यंत्रमाग व वस्त्रोद्योग,महाराष्ट्र राज्य,नागपूर.

४. मा.आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास,महाराष्ट्र राज्य,मुंबई.

५. मा.पणन संचालक,महारष्ट्र राज्य,पुणे.